# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचे समालोचन

# प्रकरण दुसरे

## संदर्भ साहित्याचे समालोचन

2.01 प्रास्ताविक

2.02 संबंधित साहित्याचा अभ्यास

2.03 संबंधित संशोधनाचे समालोचन

2.04 समारोप

संदर्भ

# प्रकरण दुसरे

## संशोधन साहित्याचे समालोचन

### 2.01 प्रास्ताविक

प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास या संशोधन विषयासाठी प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनासंदर्भात झालेल्या पाहणीचा अभ्यास संशोधकाने केला.या अभ्यासाची नोंद खाली दिलेली आहे प्रशासनाच्या बाबतीत अनेक संशोधकांनी संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत संशोधन शैक्षणिक प्रशासन या वर्गात मोडते. प्रस्तुत विषयावर अन्य कोणी संशोधन केले आहे काय ? केले असता कोठे केले ? त्या संशोधनाची उद्दिष्टे कोणतो होती. संशोधनासाठी कोणती पध्दत वापरली ? तसेच त्यांनी कोणते निष्कर्ष काढले ? कोणत्या शिफारशी केल्या ? या सर्व घटकांचा आढावा घेण्याचे संशोधकांने ठरविले आहे. त्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या संशोधनांची माहिती विविध ग्रंथातून मिळविली. या संशोधनाला अनुषंगिक अशा प्रमुख संशोधनाचे समालोचन येथे दिले आहे.

### 2.02 संबंधित साहित्याचा अभ्यास

संबंधित साहित्याचे समालोचन करण्यासाठी संशोधकाने पुधील संशोधन ग्रंथाचा अभ्यास केला.

1) **Educational Investigation in Indian Universities (1939-61)**

National Council of Educational Research And Training

New Delhi. - 1961

2) **The Third Indian year Book of Indian Research .**

National Council of Educational Research And Training New Delhi-1968

3) **Second National Survey of Secondary Teacher Education in India**

B. M. Pandey

National Council of Educational Research And Training New Delhi -1969

4) **A Survey of Research Study in Education.**

M.B.Buch

Faculty of Education and Psychology,

**Maharaja Sayajirao University of Baroda.**

India -1974

5) **Second Survey of Research in Education**

M. B. Buch

Society for Educational Research and Devt. Baroda.

India -1979

6) **Educational Research in Research in University of Bombay .**

Dr. (Mrs.) Pratibha Dev (Ed.)

Department of Education.

University of Bombay 1981

7) **Educational Research in Universities in Maharashtra Platinum Jublli year**

N. K. Patole

S. T. College Bombay -1982

8) **Third Survey of Research in Education 1978-83**

M. B, Buch

National Council Education Research And Training .

New Delhi -1986

9) **Fourth survey of Research in Education -1983-1988**

Volume -1

M. B. Buch

National Council of Educational Research And Training .

New Delhi -1991

10) **Fourth survey of Research in Education -1983-1988**

Volume -2

M. B. Buch

National Council of Educational Research And Training .

New Delhi -1991

11) **संशोधन संपदा**

शिक्षणशास्त्र, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद रौप्य महोत्सवी प्रकाशन 1964-1989

पुणे -30

1989

## 2.03 संबंधित साहित्याचे समालोचन

संशोधकाने ज्या संबंधित साहित्याचा अभ्यास केला ती संबंधित संशोधने खालीलप्रमाणे आहेत.

1) **इनामदार एन. आर.**

**" महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांतील शैक्षणिक प्रशासन "**

पथदर्शी अभ्यास आ. सी. एस. आर. नवी दिल्ली 1971 *1

पथदर्शी अभ्यास आ. सी. एस. आर. नवी दिल्ली 1971 *1

**संशोधनाची उद्दिष्टे** :– 1) जिल्हा परिषदांचा शिक्षणावर असणाऱ्या प्रभावांचा अभ्यास करणे, विशेषत: प्राथमिक शिक्षणावर ग्रामीण भागातील नेतृत्वाचा प्राथमिक शिक्षण वाढीस लागण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

**संशोधनांची वापरलेली साधने** :– संशोधकाने या अभ्यासाठी 100 शिक्षकांकडून माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला. अनौपचारीक चर्चा व प्रत्यक्षात गटविकास अधिकारी उपशिक्षणाधिकारी यांची भेट घेऊन माहिती मिळविली.

**संशोधनाची कार्यपध्दती** :– संशोधकाने या अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर कोला. हवेली तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांना प्रश्नावली देऊन त्यांच्याकडून माहिती गोळा केली. त्याचप्रमाणे जि. प. कडील शैक्षणिक प्रशासन कसे चालते, त्यांच्या अडचणी कोणत्या ही सर्व माहिती संशोधकाने गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी , पंचायत समिती हवेली, शिक्षणाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी आणि जि. प.सदस्यांकडून चर्चा करुन व वैयक्तिक भेटी घेऊन मिळविली. त्याचबरोबर पंचायत समितीचे कार्य कसे चालते याची माहिती चर्चेद्वारे घेतली.त्याचबरोबर पालकांबरोबर चर्चा करुन त्यांच्या स्थानिक परिस्थिती व शैक्षणिक समस्यांची माहिती मिळविली.

**निष्कर्ष**

1) जिल्हा परिषद अंतर्गत असणारे शैक्षणिक प्रशासन व्यवस्थित काम करीत नाही. ते दोषी आहे.

2) जिल्हा पातळीवरील संपूर्ण शैक्षणिक प्रशासनाची पुनर्रचना करण्यात यावी.

3) ग्रामिण भागातील प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन सुधारले पाहिजे.

त्याची गुणवत्ता वाढविली पाहिजे.

(2) **जोशी एच. आर.**

**" गुजरात राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासन समस्यांचा आणि आर्थिक समस्यांचा चिकीत्सक अभ्यास, विशेषत:** सद्‌स्थितीतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज व त्यांची शिक्षणातील भूमिका "

पी. एच. डी. पदवी.

एम. एस. विद्यापीठ बडोदा –1973 *2

**संशोधनाची उद्दिष्टे** :–

1) 1961 च्या पंचायत राज कायदयानंतर गुजरातमध्ये प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासन कितपत लोकशाही पध्दतीने विकेंद्रीत झाले आहे, हे पाहणे.

**संशोधनासाठी वापरलेली साधने :–**

संशोधकाने मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकडून माहिती मिळवण्यासाठी प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला.

**संशोधनाची कार्यपध्दती** :-

संशोधकाने या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला. दक्षिण गुजरातमधील चार जिल्ह्यातील एकोणीस तालुक्यातील , ब्याऐंशी (८२) ग्रामीण भागातील प्राथमिक शाळंच्या मुख्याध्यापक व शिक्षक यांना प्रश्नावली देऊन माहिती गोळा केली.

प्राथमिक शाळांचे संदर्भात प्रशासन, शाळेच्या भोवतालची परिस्थिती , विद्यार्थी शिक्षक संबंध, शैक्षणिक अडचणी याबाबत शोध घेतला .

**निष्कर्ष**

1) प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनामध्ये सुधारणा झालेली नाही.

2) प्राथमिक शिक्षणाचे ग्रामिण भगातील नेतृत्व हे अजूनही जात किंवा राजकिय पक्षावर अवलंबून आहे.

3) प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन गुंतागुंतीचे होत चालले आहे.

4) स्थानिक समाजाचे प्राथमिक शिक्षणामध्ये फार कमी सहकार्य मिळते याचे कारण म्हणजे ग्रामपंचायत सदस्यांना पुरेसे प्रशिक्षण व माहिती मिळत नाही.

(3) **बाजपाई एम.**
**" स्वातंत्र्यानंतरचा उत्तरप्रदेश राज्यातील माध्यामिक शिक्षमाच्या प्रशासनाचा अभ्यास "**

पी. एचडी. पदवी .

कानपूर विद्यापीठ 1984 *3

**संशोधनाची उद्दिष्टे** :-

1) उत्तर प्रदेशातील माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाची माहिती मिळविणे

2) प्रशासनामध्ये सुधारणा करण्यासाठी उपाय सूचविणे.

**संशोधनासाठी वापरलेली साधने** :-

शासनाकडील विविध कागदपत्रे व रिपोर्टचा अभ्यास करुन माहिती मिळविली.

**संशोधनाची कार्यपध्दती** :-

या संशोधनासाठी संशोधकाने विवध कागदपत्रे व शासनाकडील रिपोर्टवरुन माहिती मिळविली.

**निष्कर्ष**

1) माध्यमिक शिक्षण हे स्थानिक स्वराज्य संस्था व कांही संस्थाद्वारा दिले जाते

2) स्थानिक संस्थाद्वारा चालवल्या जाणाऱ्या संस्थामध्ये प्रशासन गतीशील आहे व त्यावर शासनाची कडक नजर आहे. येथील कर्मचाऱ्याच्या बदल्या केल्या जातात.

3) खाजगी संस्था व स्थानिक धार्मिक संस्थेमध्ये प्रशासनाचा दूरुपयोग केला जातो.

4) खाजगी शिक्षणसंस्थातील प्रशासन व शासनाच्या शाळातील प्रशासनामध्ये बराच फरक आहे. शासनाच्या शाळा व्यवस्थित चालवल्या जातात

5) जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या शाळा निरीक्षक यांच्या कामात बरीच वाढ झाली त्यामुळे त्यांना शाळा तपासणीच्या कामांकडे विशेष लक्ष पूरविता येत नाही.

(4) **नीपा (National Educational Planning And Administration )**

**" आंध्रप्रदेशातील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीरण संबंधात प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास करणे "**

नीपा. नवी दिल्ली -1979 *4

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी , प्राथमिक शिक्षणाचे कार्यक्षम कार्यक्रम व आधुनिक बनविण्यासाठी विविध मार्ग सुचविणे.

2) शिक्षण खाते व इतर संस्था यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी मार्ग (उपाय ) सुचविणे.

3) प्राथमिक शिक्षणाचे प्रशासन, सार्वत्रिकरणासाठी पुरेसे आहे का? हे तपासून पाहणे.

4) प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनामध्ये विकेंद्रीकरण आणण्यासाठी , प्रशासनाची चौकट सूचविणे.

**संशोधनाची साधने व कार्यपध्दती :-**

या संशोधनाची सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला . आंध्रप्रदेशातील बावीस जिल्ह्यातील 6-13 या वयोगटातील मुलांचे नावनोंदणीचे प्रमाण उतरत्या क्रमाने लावून त्यामधून प्रत्येकी चार जिल्ह्यामधून दोन जिल्हे निवडले. ज्यामध्ये सर्वात जास्त नावनोंदणी असेल व दुसऱ्या जिल्ह्यात सर्वात कमी नावनोंदणी असेल .

या सर्व जिल्ह्यातील प्रा. शिक्षण, त्याचे प्रशासन व अडचणी याचा अभ्यास करण्यात आला.

**निष्कर्ष :-**

1) मुलींचा नावनोंदणी मुलांपेक्षा अत्यंत कमी आहे.

2) गळतीचे प्रमाण अधिक आहे.

3) फक्त 50 % शाळांना इमारत आहे .

4) शाळांचे अधिकाऱ्यांकडून होणारी तपासणी अपूरी आहे.

5) पंचायत समितीकडून शिक्षणासाठी 100% खर्च केला जात नाही.

6) 60 % जिल्हा शिक्षणाधिकारी यांचा वेळ प्रशासकीय कामामध्ये जातो. शैक्षणिक कामामध्ये लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही.

7) मागासवर्गीयांसाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती वर्षाच्या सुरुवातीस मिळत नाही.

अशाच प्रकारे संशोधन खालील राज्यासाठी नीपा या संस्थेकडून करण्यात आलेले आहे.

1) आसाम - नीपा , नवी दिल्ली 1979

2) बिहार - नीपा , नवी दिल्ली 1979

3) जम्मु व काश्मीर - नीपा , नवी दिल्ली 1979

4) मध्यप्रदेश , ओरिसा , राजस्थान , उत्तरप्रदेश, प. बंगाल - नीपा , नवी दिल्ली 1979

5) **कमलम्मा**

**" केरळ राज्यातील प्राथमिक शिक्षणाचा इतिहास व प्राथमिक शिक्षणातील अडचणी. "**

पी. एच. डी.

केरळ विद्यापीठ 1969 '5

**संशोधनाची उद्दिष्टे** :-

1) प्राथमिक शिक्षणात येण्याऱ्या अडचणीचा अभ्यास करणे .

**संशोधनासाठी वापरलेली साधने** :-

शासनाचे अहवाल , शासन नियमावली, राजपत्र , मल्याळम भाषेतील साहित्या मलबारमधील लोकसंगीताचे विश्लेषण करुन माहिती मिळविली. त्याच प्रमाणे मुलाखत निरीक्षण ही साधने वापरली.

**संशोधनाची कार्यपध्दती** :-

संशोधनासाठी राज्यातील शाळेच्या एक टक्का (700 शाळा ) नमुना म्हणून निवड करण्यात आली. माहिती मिळविण्यासाठी मुलाखत व निरीक्षणाचा वापर करण्यात आला.

**निष्कर्ष** :-

1) राज्यात 6-11 या वयोगटातील 100% विद्यार्थ्यांची पटनोंदणी करण्यात आलेली आहे.

2) शाळेसाठी पुरेशा इमारती नाहीत .

3) शालेय क्रिडांगणे, पिण्याचे पाणी, शौचालय यांची सोय पुरेशी नाही.

4) फार थोडे शिक्षक रिफ्रेशर कोर्सेस व प्रशिक्षणाचा फायदा घेतात.

5) शाळा दुबार पध्दतीत असल्यामुळे बरेच प्रश्न निर्माण होतात.

6) प्रा. शाळांतील अभ्यासक्रम बऱ्याच मुख्याध्यापकांच्या मते व्यवस्थित नाही.

7) महिला शिक्षकांची संख्या वाढवावी.

8) समाजाचा शालेय कार्यात सहभाग मिळावा.

9) मुख्याध्यापकांना प्रशिक्षण देण्यात यावे.

(6) **शहा एम. आर.**

**" भारतातील शैक्षणिक प्रशासनाच्या कांही समस्या "**

पी. एचडी. (शिक्षणशास्त्र) मुंबई विद्यापीठ 1951 *6

**संशोधनाचा उदिष्टे** :-

1) भारतातील शैक्षणिक प्रशासनाच्या समस्यांचा अभ्यास करणे

2) शैक्षणिक अर्थशास्त्राचा अभ्यास करणे

3) शैक्षणिक कायद्यांचा अभ्यास करणे

4) शैक्षणिक प्रशासनातील विविध टप्प्यांचा विचार करणे –केंद्रीय , राज्यापातळी, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी संस्था.

5) शिक्षणाच्या विशेष समस्या जाणून घेणे.

**संशोधनाची साधने व कार्यपध्दती :-**

भारतातील शिक्षणाचा इतिहास व शैक्षणिक प्रशासन याबरील पुस्तकांचा अभ्यास करुन व शासनाचे अहवाल , शिक्षणाची वाढ या सर्वांची माहिती संशोधकाने मिळविली.

**निष्कर्ष** :-

1) इंग्रजांच्या राजवटीत शैक्षणिक प्रशासन हे एककेंद्री व नोकरशाहीच्या हाती होते.

2) शिक्षक प्रशिक्षित असावेत

3) शैक्षणिक संघटन सुधारण्यात यावे

4) प्रशासनाचे वेगळे प्रशिक्षण अधिकाऱ्यांना दयावे.

5) भारत सरकारने शिक्षणासाठी 10 % , राज्यशासनाने 20 % खर्च शिक्षणासाठी करावा.

(7) **पटेल व्हि. ए.**

**" मेहसाना जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनांवर पंचायत राज संस्थेचा असणारा प्रभाव "**

पी. एच. डी. पदवी.(शिक्षणशास्त्र)

एम. एस. विद्यापीठ बडोदा -1975 *7

**संशोधनाची उद्दिष्टे** :-

1) मेहसाना जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची वाढ होण्यामध्ये पंचायत राज्य व्यवस्थेचा असणारी भुमिका अभ्यासणे.

2) शिक्षकांच्या बदल्याबाबतचे पंचायतराज व्यवस्थेचे धोरण अभ्यासणे.

3) प्राथमिकशिक्षणाच्या यशापयशामध्ये असणारी पंचायत राज संस्थेची भूमिका.

4) मेहसाना जिल्हा (द. गुजरात ) ची प्राथमिक शिक्षणविषयीची माहिती मिळविणे.

**संशोधनाची साधने व कार्यपध्दती** :-

1) शासनाची प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे पाहून संशोधकाने माहिती मिळविली.

2) संशोधनासाठी पंचायत राज व्यवस्थेशी संबंधित असणारे अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन संशोधकाने माहिती मिळविली. संशोधन साधनांच्या येण्याऱ्या प्रतीसादावरुन माहिती मिळविली.

**निष्कर्ष** :-

1) प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत पंचायत राज व्यवस्थित काम करित आहे.

2) प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारामध्ये पंचायत राज व्यवस्थेचा अधिक प्रभाव आहे.

3) शाळेची गुणवत्ता सुधारली पाहिजे.

4) शिक्षकांच्या शैक्षणिक दर्जात वाढ झाली पाहिजे.

5) ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणासाठी त्यांच्या गावातच शाळा हव्यात .

(8) **गोगटे एस. बी.**

**" मराठवाडा विभागातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास "**

स्वामी रामानंद तीर्थ रिसर्च इन्सस्टिटयूट औरंगाबाद व इंडियन इन्सस्टिटयूट ऑफ एज्युकेशन पुणे यांचा संयुक्त अभ्यास

1984 *8

**संशोधनाची उदिष्टे** :-

1) प्राथमिक शाळांमध्ये असण्याऱ्या विविध सुविधाचा अभ्यास करणे

2) स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्योत्तर काळातील प्रथमिक शिक्षणाच्या गुणात्मक व संख्यात्मक वाढीचा अभ्यास करणे.

3) प्राथमिक शाळांतील नियमितपणा अभ्यासणे.

4) इ. चौथी पर्यंत विद्यार्थी जाईपर्यर्यंत होणारी नळती व स्थगिती यांचे प्रमाण व त्याची कारणे अभ्यासणे.

5) इ. पाचवीच्या विद्यर्थ्यांनी भाषा , अंकगणित, व सामान्यज्ञान यामध्ये संपादन केलेली कौशल्ये अभ्यासणे.

6) मुलांच्या तुलनेत मुलींची पटनोंदणी पडताळणे

9) **ए. जैन** :-

" महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाचा स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत झालेला विकारा "

पी. एच. डी. पदवी.(शिक्षणशास्त्र)

पुणे विद्यपीठ 1985 *9

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापनेचा अभ्यास करणे.

2) स्थानिक स्वराज्य संस्थे अंतर्गत प्राथमिक शिक्षणाचा विस्तार झाला किंवा नाही याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची साधने :-**

प्राथमिक स्वरुपाची माहिती ही सर्वसामान्य प्रशासन रिपोर्ट 1983, कमिशन अहवाल, पंचवार्षिकयोजना अहवाल, मुंबई शिक्षणाचा कायदा, शिक्षणखात्यांचे प्राथमिक शिक्षणाविषयी काढलेली विविध परिपत्रके , महाराष्ट्र शासनाचा अहवाल, प्रशासनाबाबतचे शाळामंडळाचे अहवाल, जि. प. मधील शिक्षण अहवाल व कागदपत्रे पाहून संशोधकाने माहिती मिळविली.

**संशोधनाची कार्यपध्दती :-**

पुणे जि. प. मधील शिक्षणखात्याच्या अधिकाऱ्याची मुलाखत घेउन माहिती मिळविली महानगरपालिका , सैनिकी बोर्डस , स्थानिक स्वराज्य संस्था यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या . त्याचप्रमाणे शिक्षकांशी संवाद साधुन माहिती मिळविली.

**निष्कर्ष :-**

1) 1963 पुर्वी राज्यातील पंचायत समितीला राज्याचे शिक्षणखाते आर्थिक व प्रशासकीय मदत करत होते.

2) 1923 चा प्राथमिक शिक्षणाच्या कायदयामुळे प्राथमिक शिक्षणाच्या रचनेत आमुलाग्र बदल झाला

3) 1947 च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यान्वे प्रशासनामध्ये बदल सूचविण्यात आले.

4) 1960 पर्यंत राज्यातील विभागात (प. म्हाराष्ट्र मराठवाडा, विदर्भ ) प्रशासकीय यंत्रणेत विविधता होती.

5) 1962 नंतर राज्यामध्ये सर्वत्र सारखी प्रशासकीय यंत्रणा राबविण्यात आली जि. प. कडे शिक्षणाचे प्रशासन सोपविण्यात आले.

6) जिल्हापरिषदांना राज्य सरकारकडून शिक्षणासाठी 90% अनुदान देण्यात येत होते.

7) जिल्हापरीषदांना राज्यसरकारकडून शालेय विषय, अभ्यासक्रम, पुस्तके, शिक्षकांचा दर्जा याविषयी दिशानिर्देशन होते.

8) प्राथमिक शिक्षणासाठी नगरपरिषद शिक्षणमंडळ, सैनिकी बोर्डस स्थापन केले आहेत.

9) 1960-61 पासून प्राथमिक शिक्षणावरील खर्च वाढविला आहे.

10) प्राथमिक शिक्षणाच्या विविध योजना राबविण्यात स्थानिक स्वराज्यसंस्थाचा मोठा वाटा आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणाचा विस्तार बराचसा झाला आहे.

**(10) डॉ. वामन रंगनाथ पाटील**

" उस्मानाबाद जिल्ह्याचे शैक्षणिक सर्वेक्षण "

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद पुणे.

पी.एचडी. 1989 *10

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) जिल्ह्यातील जनतेच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आमि औद्योगिक परिस्थितीचा अब्यास करणे.

2) पुर्व प्राथमिक , माध्यमिक, विद्यपीठीय या क्षेत्रातील प्रगतीचा ऐतिहासिक मागोवा घेणे.

3) जिल्ह्यातील सर्व स्तरावर अस्तित्वात असलेल्या विविध शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे.

4) शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी व शैक्षणिक सुविधा वाढिसाठी शिफारशी करणे.

**संशोधनाची साधने व कार्यपध्दती :-**

संशोधकाने खालील साधनांचा सर्वेक्षणासाठी उपयोग केला .

1) विविध अहवाल व संदर्भ साहित्य यांचा अभ्यास.

2) प्राथमिक व माध्यमिक शाळांसंबंधी माहितो प्रतवारी या अहवालावरुन एकत्र केली. ही माहिती "शाळांची प्रतवारी " या अहवालावरुन एकत्र केली आहे. ही माहीती शिक्षणाधिकारी, जिल्हापरिषद, उस्मानाबाद येथे उपलब्ध झाली. ' शाळंची प्रतवारी' ही प्रश्नावली मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांना देण्यात आली. प्रश्नावली भरुन झाल्यानंतर त्याचे वर्गीकरण करण्यातआले.

**निष्कर्ष :-**

1) प्राथमिक शाळांची संख्या अपुरी आहे.

2) एकशिक्षकी शाळांचे प्रमाण जास्त आहे.

3) शैक्षणिक मासिके व ग्रंथ याबाबतीत सर्व शाळा कमकुवत आहेत.

4) पिण्याच्या पाण्याची सोय बऱ्याच शाळांत नाही.

5) शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षणमिळावे.

2.04 **समारोप**

या सर्वांचे नीट काळजीपुर्वक अवलोकन केले असता प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित संशोधन आढळून आले नाही. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन मूलभूत आणि नाविन्यापूर्ण आहे असे म्हणता येईल.

पहिल्या संशोधनामध्ये महाराष्ट्रातील जिल्हा परिषदामधील शैक्षणिक प्रशासनाचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास करताना मुख्यत: जिल्हा परिषदांचा शिक्षणावर असणारा प्रभाव या विषयावर अधिक भर दिला आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील नेतृत्वाचा प्राथमिक शिक्षण वाढीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला आहे.

दुसऱ्या संशोधनात गुजरात राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासन समस्यांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. या मध्ये पंचायत राज कायद्यानंतर, शैक्षणिक प्रशासन कितपत लोकशाही पध्दतीने चालते हे पाहिले आहे. त्याच बरोबर प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात ग्रामीण नेतृत्वाचा अभ्यास केला आहे. या मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास केलेला आहे. परंतु आर्थिक समस्या कशा सोडवाव्यात या विषयी उपाययोजना सुचविल्या नाहीत.

माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा, पूर्ण राज्यासाठी अभ्यास झाला आहे. परंतु प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास झाला नाही. त्याच बरोबर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास झाला आहे.

सद्यस्थितीत प्राथमिक शिक्षणाच्या खालच्या स्तरापर्यंत असणाऱ्या प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करण्याची आवश्याकता आहे. प्राथमिक शाळांचे प्रशासन योग्य पध्दतीने चालणे आवश्याक आहे. हे प्रशासन व्यवस्थिक असेल तर सर्व शिक्षणाचा पाया समजला जाणारे प्राथमिक शिक्षण सर्व भागातील विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे मिळेल. या शिक्षणातून तयार झालेली नवीन पिढी

सुयोग्य वृत्तीची जोपासना करणारी, मूल्यांचे संवर्धन व संस्कृतिची जोपासना करणारी असेल.

आज प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने अनेक प्रशासकीय समस्या आहेत. या समस्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

वेळ, श्रम, साधन सामुग्री व मनुष्य बळ यांचा अधिक उपयोग करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी अत्यंत कल्पक अशा प्रशासनाची सर्वच स्तरावर आवश्याकता आहे.

त्यासाठी प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनात बदल घडवून आणणे ही आधुनिक काळाची गरज आहे. आत्ता पर्यंत झालेल्या अभ्यासावरुन प्राथमिक शाळांच्या प्रशासनात कोणकोणत्या अडचणी येतात? त्यांची प्रशासन व्यवस्था कशी असावी? या सर्व प्रश्नांचे स्पष्टीकरण होत नाही.

या दृष्टीकोनातुन प्रस्तुत संशोधन इतर संशोधनाहून वेगळे आहे. म्हणून संशोधकाने प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यासाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

## संदर्भ

1 **N. R. Inamdar** :- A Pilot Study By
Indian Council Of Social Science Research.
New Delhi- 1971.
Page No. -631.

2 **H. R. Joshi** :- Second Survey Of Research In Education .
M. B. Buch
Maharaja Sayajirao University, Baroda 1974
Page No. - 682

3 **M. Bajpai** :- Fourth Survey Of Research in Education
Vol. II
M. B. Buch
National Council Of Educational Research And Training
New Delhi-1991
Page No. 1072, 1073.

4 **NIEPA** :- Third Survey Of Research In Education
M. B. Buch
National Council Of Research In Educational Research And Training.
New Delhi 1986

Page No. 919-920.

5 **Kamalamma** :- A Survey Of Research In Education.
M. B. Buch
First Edition, Baroda, Centre Of Advanced Study in Education,
M. S. University 1974
Page No. 63-64.

6 **M. R. shah** :- A Survey Of Research In Education.
M. B. Buch
First Edition, Baroda, Centre Of Advanced Study in Education,
M. S. University 1974
Page No. 647

7 **V. A. Patel** :- Second Survey Of Research In Education .
M. B. Buch
Maharaja Sayajirao University, Baroda 1974
Page No. - 485-486

8 **S. B. Gogate** :- Fourth Survey Of Research in Education
Vol. II
M. B. Buch

National Council Of Educational Research And Training

New Delhi-1991

Page No. 1458-1459.

9 **A. Jain** :- Fourth Survey Of Research in Education

Vol. II

M. B. Buch

National Council Of Educational Research And Training

New Delhi-1991

Page No. 1460.

10 **महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद** -- **" संशोधन संपदा "**

नागपुरे व.रा.

शिक्षण शास्त्र संस्था

रौप्य महोत्सवी वर्ष प्रकाशन (1964-1989)

पुणे, 30.

पृष्ठ क्रं. 32, 33, 34.